**वाचा:—** जिल्हा न्यायालय, नांदेड परिपत्रक जावक क्र./सां./७३६३/२०२२, दिनांक २१.०९.२०२२

## कार्यालयीन आदेश

नांदेड मुख्यालयी कार्यरत फौजदारी न्यायालयांमधील आरोपींच्या रिमांडच्या कामाचा आढावा घेतल्यानंतर मोठया प्रमाणात कारागृहातील आरोपींच्या रिमांडचे कामकाज पोलिस यंत्रणेद्वारे व अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह, नांदेड यांच्यामार्फत करण्यात येते. नांदेड येथील एस.सी.एम.एस. कमिटीच्या बैठकीत झालेल्या चर्चेअंती असे दिसुन येते की, रिमांडच्या कामकाजात कारागृहातील आरोपींच्या संख्येप्रमाणे संबंधीत पोलिस कर्मचा—यांची संख्या व वाहनांची संख्या अपुरी पडत असल्यामुळे कारागृहातील आरोपींच्या रिमांडच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत.

सदर अडचणींचे निराकरण होण्याच्या दृष्टीने कारागृहातील ज्या आरोपींना वाढीव न्यायालयीन कोठडीचे(दोषारोप न दाखल झालेल्या गुन्हयातील) प्रत्यक्ष नेमलेल्या तारखेस न्यायालयात हजर करण्याची आवश्यकता नाही अशा आरोपींचे रिमांड न्यायालयीन कामाकाजाच्या दिवशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा नांदेड मुख्यालयी सत्र न्यायालयांमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार घेतले जावे.

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | वेळ | कामकाजाचे वर्णन | खोली क्रमांक | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा न्यायाधीश— १ तथा अति. सत्र न्यायाधीश, नांदेड | दुपारी २.३० ते ३.०० | विशेष कायदयाखालील प्रकरणांमध्ये | व्ही.सी. खोली क्र. ५२ | दि.०३/०२/२०२५ ते दि. ०७/०२/२०२५, दि.१७/०२/२०२५ ते दि. १८/०२/२०२५, दि.२०/०२/२०२५ ते दि. २१/०२/२०२५ |
| २. | जिल्हा न्यायाधीश— २ तथा अति. सत्र न्यायाधीश, नांदेड | दुपारी २.३० ते ३.०० | विशेष कायदयाखालील प्रकरणांमध्ये | व्ही.सी. खोली क्र. ५२ | दि.०१/०२/२०२५ , दि. १०/०२/२०२५ ते दि. १५/०२/२०२५, दि.२४/०२/२०२५ ते दि. २५/०२/२०२५, दि.२७/०२/२०२५ ते दि. २८/०२/२०२५ |
| ३. | जिल्हा न्यायाधीश— ३ तथा अति. सत्र न्यायाधीश, नांदेड | दुपारी २.३० ते ३.०० | इतर प्रलंबित खटल्यातील व दोषारोप न दाखल झालेल्या गुन्हयातील | व्ही.सी. खोली क्र. ५२ | दि.०३/०२/२०२५ ते दि. ०७/०२/२०२५, दि.१७/०२/२०२५ ते दि. १८/०२/२०२५, दि.२०/०२/२०२५ ते दि. २१/०२/२०२५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा अति. सत्र न्यायाधीश, नांदेड | दुपारी २.३० ते ३.०० | इतर प्रलंबित खटल्यातील व दोषारोप न दाखल झालेल्या गुन्हयातील | व्ही.सी. खोली क्र. ५२ | दि.०१/०२/२०२५ , दि. १०/०२/२०२५ ते दि. १५/०२/२०२५, दि.२४/०२/२०२५ ते दि. २५/०२/२०२५, दि.२७/०२/२०२५ ते दि. २८/०२/२०२५ |

तसेच नमुद कालावधीत जे न्यायिक अधिकारी रजेवर असतील त्या दिवशी त्यांचा कार्यभार ज्या न्यायिक अधिकारी यांच्याकडे असेल त्यांनी ते काम पाहावे.

तसेच वर नमुद न्यायालयातील लिपीकास निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी कामाकाजाच्या दिवशी जे न्यायालय रिमांडचे काम पाहणार आहेत त्या न्यायालयाच्या संबंधीत विभागाच्या लिपीकाकडे रिमांडची कागदपत्रे दयावीत व कामकाज संपताच पुन्हा ती कागदपत्रे स्वीकारावीत.

सदर आदेश दिनांक ०१/०२/२०२५ पासुन अमलात येईल.

जिल्हा न्यायालय, नांदेड )
)
दिनांक: २७/०१/२०२५ )

Sd/-
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
नांदेड.

००००००

जावक क्र./फौ.अपिल/ 891 /२०२५.

**प्रतिलिपी माहितीस्तव व अनुपालनास्तवः–**

१– जिल्हा न्यायाधीश– १ तथा अति. सत्र न्यायाधीश, नांदेड.
२– जिल्हा न्यायाधीश– २ तथा अति. सत्र न्यायाधीश, नांदेड
३– जिल्हा न्यायाधीश– ३ तथा सहा. सत्र न्यायाधीश, नांदेड
४– अतिरिक्त सह जिल्हा व सत्र न्यायाधीश–१, नांदेड.
५– तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ तथा अति सत्र न्यायाधीश, नांदेड
६– अध्यक्ष, बार असोसिएशन नांदेड.
७– प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड.
८– अधिक्षक, आस्था / न्यायीक/ निरिक्षण, जिल्हा न्यायालय, नांदेड.
९– संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड.
१०– पोलिस अधिक्षक, नांदेड.
११– अधिक्षक, जिल्हा कारागृह, नांदेड.
१२– नांदेड मुख्यालयातील पोलिस ठाणे, वजिराबाद / इतवारा / शिवाजीनगर /भाग्यनगर / नांदेड ग्रामीण / विमानतळ/ लिंबगांव.
यांना माहितीस्तव व अनुपालनास्तव सादर.

जिल्हा न्यायालय, नांदेड )

दिनांक: २७/०१/२०२५ )

Sd/- 27.01.2025
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड.